# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

**परिपत्रक क्र. --१८----/२०२१**

**<u>गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत महाविद्यालयांनी ऑनलाईन पद्धतीने हिशेब सादर करण्यासाठी दुसऱ्यांदा व अंतिम मुदत वाढ दि. ३१ जानेवारी, २०२१ पर्यंत देणेबाबत...</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत महाविद्यालय/परिसंस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने महाविद्यालयास/परिसंस्थेस चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा आयोजन तसेच उपकरणे, क्रीडा साहित्य, बांधकाम/सौर ऊर्जा उपकरणे खरेदी याकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थांनी अर्थसहाय्य करता ऑनलाईन पद्धतीने माहिती अपलोड करण्यासाठी परिपत्रक क्र. ३६४/२०२१ नुसार दि. १० जानेवारी २०२१ अखेर पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती. परंतु अनेक संस्थांनी ऑनलाईन हिशोब अपलोड करण्याची मुदत वाढवून मिळावी, अशी विनंती केली आहे.

त्यामुळे परिपत्रक क्र. ३४७/२०२० मधील अटी व नियमास अधिन राहून महाविद्यालय/परिसंस्थांनी गुणवत्ता सुधार योजनेचे हिशेब अपलोड करण्याची मुदत या परिपत्रकानुसार दि. ३१ जानेवारी, २०२१ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

महाविद्यालय/परिसंस्था यांना गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत मंजूर झालेल्या अर्थसहाय्याचे हिशोब ३१ जानेवारी, २०२१ या अंतिम मुदत वाढीमध्येच ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. त्यानंतर विद्यापीठामार्फत कोणतेही हिशेब स्विकारले जाणार नाहीत व कोणत्याही प्रकारे अर्थसहाय्य अदा केले जाणार नाही.

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०२०-२१/१२८८
दिनांक : १९ जानेवारी, २०२१

**सीए अतुल पाटणकर**
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.